# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चामहा. ३५) च्या कलम ३ च्या पोट कलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीतव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

**एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली— ४४२६०५**

**डॉ. ईश्वरश्रा. मोहुर्ले (कुलसचिव)** — दुरध्वनी: ०७१३२—२२३१०४

एम.एस्सी. (भौतिकशास्त्र),पीएच.डी. — ई—मेल: gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/११९३१ /२०२० — दिनांक ०४/११/२०२०

**प्रति,**

मा. अधिसभा सदस्य, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य.
मा. विद्यापरिषद सदस्य तथा विविध अभ्यास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— 'दशमानोत्सव वर्ष' निमित्त कार्यक्रमाच्या तयारी करीता आयोजित आभासी (Online) सभेस दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी उपस्थित राहण्याबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीने १० व्या वर्षात पदार्पण केल्या निमीत्त आगामी २०२०—२१ या वर्ष भरात विविध कार्यक्रमांचे/उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रम/उपक्रमांची सुरूवात **दिनांक ०७/११/२०२०**रोजी होणार आहे. सदर उद्घाटनपर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल तथा विद्यापीठाचे सन्माननीय कुलपती **मा. भगतसिंहजी कोश्यारी** हे मार्गदर्शन करणार असून विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष **मा. प्रा. डी.पी. सिंह** हे मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन करतील. विद्यापीठाचे कुलगुरू **प्रा. श्रीनिवास वरखेडी** हे सुध्दा या प्रसंगी विद्यापीठाची भुमिका विषद करणार आहेत. गोंडवाना विद्यापीठाचे महत्वाचे शैक्षणिक घटक म्हणून आपण व आपले महाविद्यालयाने मोठी जबाबदारीची भुमिका आजपर्यंत निभावीलेली आहे. विद्यापीठाच्या दशमानोत्सव वर्ष आयोजना मध्ये आपली भुमिका अतिशय मोलाची असणार आहे.

मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या निर्देशान्वये या कार्यक्रमाच्या तयारी करीता मा. अधिसभा सदस्य, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य आणि मा. विद्यापरिषद सदस्य आणि विविध अभ्यास मंडळ यांची संयुक्त आभासी (Online) सभा दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी २.०० ते ३.०० वाजता आयोजीत केलेली आहे. सदर कार्यक्रमा करीता (webex link) दिलेल्या https://bit.ly/3mJ0ARA या लिंक वर आभासी (Online) सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

धन्यवाद !

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली